The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्यातील राष्ट्रवाद व समाज चिंतन

**बाळासाहेब नारायण बोराडे**
(संशोधक विदयार्थी)
संशोधन केंद्र-स्व. अण्णासाहेब आर.डी देवरे कला व विज्ञान महाविदयालय म्हसदी, ता. साक्री जि. धुळे
प्रा. डॉ. वाल्मिक शंकर आढावे
(संशोधक मार्गदर्शक) सहयोगी प्राध्यापक, स्व. अण्णासाहेब आर.डी देवरे कला व विज्ञान महाविदयालय म्हसदी, ता. साक्री जि. धुळे

**प्रतावना :-** भारत ही पावित्र्य, मांगल्यांची भूमी आहे. देशाला गौरवशाली साहित्य, संस्कृती व संस्काराचा वारसा आहे. थोर संत, साहित्यिक, सुधारक, समाजसेवक, क्रांतिकार अशा अनेक नरवीरांनी भारत मातेच्या उदरी जन्म घेतला. भारतभूने जगाला सत्य आणि अहिंसेचा मार्ग दाखवला. शांती, मानवता, विश्वबंधुता ही या संस्कृतीची जीवनमूल्य आहेत. इथल्या कणांकणांत संत संदेश तर क्षणाक्षणाला मानवतेच्या उपदेशाचे दर्शन घडते. येथील पराक्रम साहस आणि शौर्याची विजयी गाथा अजरामर आहे. या पुण्यभूमीत भगवान गौतमबुध्द,भगवान महावीर महात्मा बसेवश्वर, संत गुरुगोविंदसिंग, संत कबीर यांसारख्या महामानवांनी जगाला मानवतेचा संदेश दिला.

“महाराष्ट्रालाही संत साहित्याची अतिप्राचीन परंपरा लाभली. संत विचारांचा वारसा अविरतपणे चालू आहे. संत तूकाराम, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत रामदास,, संत एकनाथ, संत श्रीचक्रधर स्वामी, संत चोखामेळा, सतं सावता माळी संत नरहरी सोनार, संत गोराबा कुंभार, संत जनाबाई संत मुक्ताबाई, संत बहिनाबाई, संत मीराबाई, संत कान्होपात्रा, संत निर्मळा यांनी संत साहित्यातून जनसामान्यांना मार्ग दाखवून अध्यात्मातून मानवतेची शिकवण दिली”[१]

आधुनिक कालखंडात विदर्भामध्ये अनेक संत होऊन गेले. त्यामध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, वैराग्यमुती संत गाडगे बाबा, प्रज्ञाचक्षू गुलाबराव महाराज, यांनी आपल्या संत साहित्यातून मरगळलेल्या समाजाला जागृत करून समाज प्रबोधन केले. विपूल प्रमाणात साहित्य निर्मिती केली. मराठी वाङ:मयात संत साहित्याचे भरीव असे योगदान आहे.राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी विविध प्रकारात साहित्य निर्मिती केली. मराठी हिंदी भाषा प्रमाणेच वैदर्भीय बोली भाषेचा प्रभाव त्यांच्या साहित्यातून दिसून येतो भजनावली, श्लोक, अभंग, ओव्या,पोवाडे, प्रार्थना, देशभक्तीपर गीते प्रेरणादायी कविता व इतर संपादित वाङ:मयनिर्माण केले. त्यांच्या समग्र साहित्यातून समाज चिंतन व राष्ट्रवाद दिसून येतो.

भूदान यज्ञ प्रवर्तक विनोबा भावे म्हणतात की, “श्री संत तुकडोजी महाराज हे कित्येक वर्ष अंखड जनसेवेत राबले. ग्रामीण जनसेवाचा ध्यास त्यांनी धरला होता. लोकांत सदभावना, जनजागृती करण्याचे काम भजनाव्दारे आरंभीले. त्यांच्या भजनांनी गोवोगावी चालनारे तमाशे आणि गचाळ गाणी बंद पडली. सदभावनेच्या भांडवलावर ग्रामरचनेचा उद्योग त्यांनी हाती घेतला. शेवटी भूदान चळवळीत उडी घेतली.”[२] संत तुकडोजी महाराजांच्या साहित्याची वैशिष्टयें म्हणजे ग्राम-जीवनाबददल तळमळ,

अध्यात्मिक प्रेरणा, वैज्ञानिक दृष्टीकोण, मानवता, विश्वशांती, सामाजीक समता, राष्ट्रनिष्ठा, भारतीय तत्त्वज्ञान, आरोग्य, शिक्षण, नैतिकमूल्य, अध्यात्मधिष्टीत मानवी जीवनांची मांडणी यासारखे अनेक वषिय हाताळले आहेत. सुलभता व छंदबध्द रचना त्यांच्या साहित्यातून दिसून येते. आंतरीक प्रेरणा, वर्तमानकाली समस्या निवारण, शाश्वत ग्राम विकास ही देखिल महत्वाची वैशिष्टये दिसून येतात.

ग्रामगीता, विश्वशांती साधना, राष्टीय, हिंदी भजनावली, राष्ट्रीय मराठी भजनावली, अनूभवसार, सेवाधर्म, लोकशाहीचा पोवाडा, अग्नी भडकला युध्दाचा, राष्ट्रसंत - समग्र गद्य वाङःमय, राष्ट्रसंत -समग्र पद्य वाङःमय, आध्यात्मिक भजनावली, व इतर संपादित वाङःमयाची निर्मिती केली. प्रस्तुत शोधनिंबधातून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्यातील राष्ट्रवाद व समाज चिंतन यावर प्रकश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्यातील राष्ट्रवाद व समाज चिंतन**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्यातील राष्ट्रवाद व समाज चिंतन या विषयी शोधनिबंधाच्या माध्यमातून जाणून घ्योण्याचा प्रयत्न केला असता असे दिसुन येते की, जनसेवा, राष्ट्रवाद, या विषयांसंदर्भात लिखाण केले आहे. भारतीय तत्त्वज्ञान, बलोपासना, सामाजिक सद्भावना, राष्ट्रीय एकात्मता, सत्य, शील, चारित्र्य, मनशुध्दी, ग्रामस्वच्छता यासरख्या मानवी मूल्यांचे दर्शन त्यांच्या साहित्यातून घडते. ग्राम विकास, सुदृढ आरोग्य,स्वावलंबन, लोकशिक्षण, संस्कार, नैतीकमूल्य या विचारांचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी उभं आयुष्य त्यांनी खर्ची केलं. ग्राम विकास हा त्यांच्या साहित्याचा आत्मा आहे. ख-या ईश्वरभक्तीचे ज्ञान व्हावे यासाठी संत तुकडोजी महाराजांनी भजन, कीर्तन, प्रवचन, भाषणे, चर्चासत्र, बैठका, शिबीरे, संमेलने या माध्यमातून समाज प्रबोधन केले. ग्रामविकास व जनसेवेची नाळ त्यांनी कधीच तुटू दिली नाही.समाजहीत लक्षात घेऊन साहित्य निर्मिती केली. समाजातील भेदाभेद गळून जावे म्हणून आपण सर्वजन एकाच ईवशरांची लेकरं आहोत हे भक्तीच्या मार्गान पटवून दिले. सर्वांच्या हदयात बंधुत्वाची भावना निर्माण व्हावी यासाठी प्रयत्न केले. समाजातील वास्तव चित्रण त्यांनी साहित्यातून मांडले.

समाजातील अज्ञान, अंधश्रध्दा, देवभोळेपणा, विषमता, अस्पृश्यता, यावर प्रहार केला. उच्चनिच, गरीब-श्रीमंत, जाती, पंथ, पक्ष, धर्म, या पलीकडे जाऊन मानवतावादी दृष्टीकोनातून साहित्याची मांडणी केली. धर्माचे खरे तत्त्वज्ञान जनसामान्यांपर्यत पोहचविले. प्रबोधनातून व्यक्ती, कुटूंब, समाज व राष्ट्रामध्ये आपल्या वाणीतून नवचैतन्य निर्माण केले. वाईट प्रथांना तिलांजली दिली. स्वाभिमानजागृत केला चांगल्या व वाईट गोष्टीमधील भेद लोकांना समाजावून सांगितला. अस्पृश्यता, जातीनिर्मूलन यासाठी महान कार्य केले.

ख्यातनाम साहित्यिकव ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त विचारवंत वि.स. खांडेकर यांनी ग्रामगीता या ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे की“संत तुकडोजी महाराजांच्या जीवनाची बैठक रामदास, विवेकानंद, विनोबाजी इत्यादी साधूपुरुषांसारखी आहे. परमेश्वरांवर त्यांची नितांत श्रध्दा आहे. परंतू त्यांना अज्ञान, दारिद्रय व आळस यांच्या पाशात सापडलेल्या दिन दलित देश बांधवात देव दिसतो.”[3] राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्यातून ग्राम जीवनाबध्दलची तळमळ दिसून येते. भारत हा खेडयांचा देश

आहे. खेडयांचा विकास झाला तरचं देशाच विकास होईल. ग्राम स्वावलंबी, समृध्द, निरोगी असले पाहिजे. खेडी इतकी समृध्द व्हावी की गावावरुन देशाची ओळख निर्माण व्हावी. ग्रामीण भागात उद्योग व मनोरंजन सुविधा नसल्याने लोकं शहराकडे धाव घेतात. त्यामुळे गावेचीगावे ओस पडत आहेत.

ग्रामीण भागातील लोकांचे स्थलांतर थांबवायचे असेल तर शहरातील सर्व सुखसोयी गावात मिळाल्या पाहिजे. अन्यथा ग्राम बकाल झाल्याशिवाय राहणार नाही. खेड्यात ग्राम सफाई, सूतकताई, दवाखाने, उद्योग, शाळा, महाविद्यालय, जीवनशिक्षण, वाचनालय, व्यायामशाळा मनोरंजन या सुविधा निर्माण झाल्यास खेडी स्वयंपर्ण होतील. असा त्यांचा दृढ विश्वास होता. ग्रामविकासाशिवाय देशाच विकास अशक्य. ग्रामसेवा हीच खरी ईश्वरसेवा अशी त्यांची धारणा होती. त्यांनी वाणी आणि लेखणीतून जनजागृती निर्माण केली.

"नवभारताच्या निर्मीतीत ग्रामसुधारणेचे महत्व त्यांनी ओळखले होते. सुप्रसिध्द भगवदगीतेप्रमाणेच ग्रामगीतेत अध्यात्म आणि व्यवहार यांचे सुंदर मिलन झाल्याचे दिसून येते".[४] राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे राष्ट्रीय विचार प्रेरणादायी आहेत. प्रखर राष्ट्रवाद हे त्यांच्या साहित्याचे खास वैशिष्टये. देशभक्तीपर कविता, गीते आजही मुखेग्द आहेत. राष्ट्रीय हिंदी भजनावली, मराठी भजनावली, या माध्यमातून युवकांच्या हदयात देशभक्ती जागवण्याचे महान कार्य त्यांनी केले. १९४१ मध्ये व्यक्तीगत सत्याग्रहात भाग घेतला. भारत छोडो आंदोलनातही सामील झाले. देशाच्या स्वातंत्र्य लढयातही अग्रगण्य होते. त्याबददल इंग्रजांनी त्यांना कैद केले होते. कारावासही ठोठावला परंतु ते डगमगले नाही. भजन, कीर्तन, खंजिरीच्या माध्यमातून देशकार्य करत राहीले. राष्ट्रीय कार्याची दखल घेत तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी त्यांना राष्ट्रसंत ही उपाधी दिली.

"थोर समाजसुधारक माहात्मा फुले हे विधवा स्त्रीया, अनाथ मुले, अश्पृश्य व श्रमीक समाजाच्या सुखासाठी झटले. मुलींसाठी महिली शाळा काढली. बालहत्या प्रतिबंधक गृह स्थापन केले,अश्पृश्यांना आपली विहीर खुली करुन दिली. त्यांच्या या महान कर्याबध्दल राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात,

"लाख बोलक्यांहून थोर । एकची माझा कर्तबगार ।
हे वचन पाळूनी सुंदर । गांव सुधरावे कार्याने ।"[५]

१९६२ मध्ये भारत - चीन युध्द सुरु झाले. सीमारेषा ओलांडून चीनने भारतीय हददीत हमले सुरु केले. भारतीय सैनिकांनीही प्रतिहल्ला चढवला. यावेळी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज मंदीरात भजन, कीर्तन करता न बसता थेट हिमालयाच्या कुशीत गेले. खंजिरीवर थाप मारुन राष्ट्रीय गीतांच्या माध्यमातून सैनिकांचा आत्मविश्वास वाढविला. भारतीयांच्या हदयात देशभक्तीची ज्योत पेटवली. त्यांच्या वाणीतून वीररस ओसंडून वाहत असे. त्यांनी आपल्या बुलंद आवाजातून सैनिकांचे मनोबल वाढविले. देशभक्तीपर गीतातून चीनला ललकारले......

"तैयार हुआ, तैयार हुआ, हिंद तूम्हारे साथ
आओ चीनीयो मैदान मे, देखो हिंद का हात".[६]

संत तुकडोजी महाराजांनी गद्यपद्य स्वरुपात विपूल साहित्य निर्मिती केली. त्यांच्या काव्यांचा पाठयक्रमातही समावेश असतो."अग्नी भडकला युध्दाचा" या पुस्तकाच्या माध्यमातून तरुणांच्या मनात क्रांतिची मशाल पेटवली. राष्ट्रभक्तीचा महामंत्र दिला. परकीय शक्तीपासून देशाला धोका आहे शत्रू आक्रमण करण्याच्या तयारीत आहे. युध्दाचा वणवा पेटला. तरुणा बघतोस काय? छातीला माती लाव अनं सैन्यात भरती हो. शहीद झालस तर देशभर कीर्ती पसरेल. जिंकलास तर भारत का वीर म्हणून सन्मान मिळेल. सिंहासम तूझी छाती अन पोलादासम हात. विलंब न करता लढाईसाठी सज्ज हो.

"अग्नी भडकला युध्दाचा अन तू आळशी होऊन बसे,
तरुण असूनी रक्त न उसळे नौजवान तूज म्हणवे कसे"[७]

देशाच्या तत्कालीन स्थितीचे वर्णन त्यांच्या साहित्यातून दिसते. एकेकाळी भारताला सोने की चिडीया म्हणून ओळखले जायचे. देशात लोक सुखी, संपन्न होते. आरोग्य सुदृढ होते. धरणे तुडूंब भरलेली, नदी-नाले खळाळून वाहत. निसर्गसंपन्नतेमुळे शेतकरी सुखी, समाधानी होता. आज उलट स्थिती आहे. देशात दु:ख, दारिद्रय, बेकारी, रोगराई, विषमता वाढतच आहे. गरीब अधिक गरीब होत आहेत. सर्वत्र एकीचा अभाव दिसून येत आहे. देशात अवकळा निर्माण झाली त्यावर त्यांनी आपल्या काव्यातून प्रकाश टाकला.

"अवकळा अशी का आली रे, भारता तुझ्या देहाला किती धनिक तूझे कुळ होते. तुज भानच याचे
नव्हते हे विघ्न कोठून आले रे भाता तूझ्या देहाला अवकळा अशी का आली रे"[८]

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आधूनिक काळातील उद्योग, व्यवसायचे महत्व जाणले होते. उद्योगांच्या घरी, देवता लक्ष्मी वास करी या म्हणीप्रमाणे ग्राम - उद्योगातून स्वावलंबी खेडी ही संकल्पना त्यांनी मांडली. उद्योगांशिवाय देशाची उन्नती नाही. तरुणांना त्यांनी उद्यमशीलतेचे महत्व पटवून दिले. आळस झटकून युवकांनी छोटे-मोठे व्यवसाय सुरु करावे, शेतीपूरक व्यवसाय सुरु करुन उत्पादनात वाढ करावी. जीवन स्वावलंबी असावे देह झिजवून राष्ट्रकार्यासाठी समर्पीत करावा. यासंदर्भात खालील काव्यपंक्ती समर्पक आहेत.

"बसलास कशाला आळशी बनायला, चाल पूढ देशाचे काम करायला
दिसायला धटा शक्तीने लठा, जेवायला पाहिजे दही दुध मठा
काय झाले, शेतावर जायला, चाल पूढं देशाचे काम करायला"[९]

भारत बंधूभाव नांदावा देशातील नागरिकांमध्ये प्रेम, आणि स्नेहाचे नाते असावे. सर्वांमध्ये राष्टीयत्वाची भावना निर्माण व्हावी. यासाठी त्यांनी 'या भारतात' या काव्यरचनेतून देशवासीयांना उपदेश केला आहे. त्यांचे साहित्य म्हणजे भारतीयत्वाची ओळख. भारत देश विविधतेने नटलेला आहे. देशातील जाती, पंथ, संप्रदाय भेद नष्ट व्हावे. सर्वत्र सुख शांती, समृध्दी असावी. धर्माधर्मातील एकोपा वाढावा सत्य, शील, चारित्र्य वीरता या सदगुणांची जोपासना व्हावी. युवकांनी उद्योगशील बनावे, जातीभेद विसरुन अस्पृश्यता समूळ नष्ट व्हावी. भारत विश्वगुरु बनावा यासाठी ते ईश्वराकडे प्रार्थना करतात.

"या भारतात बंधूभाव नित्य वसु दे, दे वरचि असा दे

हे सर्व पंथ संप्रदाय एक दिसु दे, मतभेद नसू दे
नांदोंत सुखे गरीब अमीर एक मतांनी, मग हिंदू असो, ख्रिश्चन वा ते इस्लामी
स्वातंत्र्यसुख या सकलांमाजी वसू दे, सकलांस कळो मानवता राष्ट्रभावना
सर्व स्थळी मिळूनी समुदाय प्रार्थना, उद्योगी तरुण शीलवान येथे दिसू दे
जातीभाव विसरुनिया एक हो आम्ही, अस्पृश्यता समूळ नष्ट हो जगातूनी
खलनिंदकामनीही सत्य, न्याय वसू दे, दे वरचि असा दे"[१०]

शेवटी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज देशाच्या कल्यासाठी प्रार्थना करतात. मातृभूमीपुढेनतमस्तक होऊन राष्ट्रस वंदन करतात. देश भक्तीची मशाल युवकांच्या हदयात पेटवतात. देश देशवासीय यांच्या बददल त्यांच्या मनात नितांत आदर आहे. राष्ट्रकल्यासाठी ईश्वराकडे प्रार्थना करतात. तन-मन-धनाने भारत सुखी व्हावा. सर्वधर्म, पंथ, पक्ष यांना प्रिय वाटावा देशातील जनता निर्भय असावी. त्याच्या हातून मंगल कार्य घडावे. स्पृश्यअसपृश्यता भेद नष्ट व्हावे. संकट समयी सर्वानी सैनिक होऊन देशाचे रक्षण करावे.

"तन, मन, धन से सदा सुखी हो, भारत देश हमारा
सभीधर्म पंथ पक्ष को दिल से लगे प्यारा
विजयी हो विजयो हो भारत देश हमारा
ब्रम्हचर्य अध्यात्म दैविगुण, घर घर मे प्रगटाने
सारा भारत राहे शिपाई, शत्रू को दहशाने
तुकडयादास कहे स्फूर्ती हो, सबको भक्ती करणे ।
विजयी हो, विजयी हो, विजयी हो, भारत देश हमारा।[११]

समारोप :-

प्रस्तूत शोधनिबंधात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्यातील राष्ट्रवाद व समाज चिंतन यांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला. आधुनिक कालखंडातील वैदर्भीय संतांमध्ये तुकडोजी महारांचे स्थान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्यांच्या समग्र वाङःमयाचा अभ्यासातून ग्राम-निर्माण, राष्ट्रनिष्ठा उदयमशीलता, निसर्ग संवर्धन, सत्यशील, चारित्र्य, देशसेवा, मानवी मूल्यांची जोपासना यासारखी वैशिष्टे दिसून येतात. विश्वातील मानव जातीचे कल्याण ही एक त्यांच्या साहित्याची प्रेरणा आहे. संत साहित्याचा अभ्यास करतांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्यातील राष्ट्रवाद व समाज चिंतन यांचा अभ्यास करणे गरजेचे वाटते.

निष्कर्ष :-

१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी साहित्यातून समाजवास्तवाचा वेध घेण्याचा प्रयत्न.
२) त्यांनी साहित्यातून अध्यात्मधिष्ठीत जीवन विकासाची मांडणी केली आहे.
३) मानवता व विश्वबंधूता या दृष्टीकोनातून साहित्य लिखण
४) समग्र-वाङःमयातून मानवी मूल्यांचे दर्शन घडते.
५) गद्य-पद्य रचनेतून प्रतिभासृष्टी व अनुभव विश्वाची निर्मीती.

६) ग्राम निर्माण, उदयमशीलता, स्वालंबन या संकल्पनेवर भर.
७) राष्ट्रीय एकता, अखंडता, भारतीय तत्वज्ञानाचे दर्शन.
८) भजन, कीर्तन, प्रवचन यातून समाजप्रबोधन.
९) त्यांच्या साहित्यातून अज्ञान, अंधश्रध्दा, देवभोळेपण यावर प्राहर.
१०) आध्यात्म आणि वैज्ञानिक दृष्टीकोन यांची सांगड
११) प्रखर देशभक्ती आणि राष्ट्रनिष्ठा.
१२) मराठी, हिंदी व अस्सल वैदर्भी बोलीभाषेचा साहित्यावर प्रभाव.

संदर्भ ग्रथ :-


१) प्रा. डहाके वसंत आबाजी संपादक, संत साहित्य आकलन आणि अध्यापन, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे (प्रास्ताविक ) पृष्ठ क्रमांक १.
२) भावे विनोबा - भूदान यज्ञ प्रवर्तक - प्रस्तावना ग्रामगीता, दुसरी आवृत्ती १ मे २०००
३) खांडेकर वि.स. ख्यातनाम साहित्यीक, ज्ञानपिठ पुरस्कार विजेते, पुष्पांजली, ग्रामगीता, दुसरी आवृत्ती १ मे २०००
४) कोलते वि.धी. (डॉ.), महानुभव साहित्याचे प्रमुख संशोधक, गीता-गौरव, ग्रामगीता दुसरी आवृत्ती १ मे २०००
५) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज-ग्रामगती, अध्याय, ७, ओवी १०७, पृष्ट क्रमांक ६६,३२ आवृत्ती
६) राष्ट्रीय भजनावली हिंदी, भजन क्रमांक ८६, पेज क्रमांक ५१, ९ वी आवृत्ती
७) भक्तीकुंज भजनावली, भजन क्रमांक ५५, पेज ३५ ७ आवृत्ती
८) अनुभव सागर भाग - २, भजन क्रमांक ४६ पेज क्रमांक ३६, ८ वी आवृत्ती
९) नव जागृती भजनावली भजन क्रमांक १७, पेज क्रमांक ११, आवृत्ती २४ वी.
१०) राष्ट्रीय मराठी भजनावली -भजन क्रमांक १, पुष्ठ क्रमांक १, १२ वी आवृत्ती, ग्रामगीता ३२ वा आध्याय
११) ग्रामगीता " राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
१२) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व्यक्ती आणि वाङ:मय - डॉ. अक्षय कुमार काळे
१३) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज गौरवग्रंथ - प्रा. रा.तू.भगत, डॉ. सुभाष सावरकर
१४) विश्वशांतीची साधना - संत तुकडोजी महाराज
१५) लोकशाहीचा पोवाडा - संत तुकडोजी महाराज
१६) राष्ट्रसंत - समग्र पद्य वाङ:मय - संत तुकडोजी महाराज खंड १ ते १०
१७) अनूभव सागर भजनावली - संत तुकडोजी महाराज
१८) डंका तुकडोजीचा - राजाराम कानतोडे
१९) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज - प्रा. राजेंद्र मूंढे
२०) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज - डॉ. भास्कर गिरधारी


**राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्यातील राष्ट्रवाद व समाज चिंतन**

**बाळासाहेब नारायण बोराडे**